**प्रेसनोट**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती
दिनांक : ०५/०३/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती घटक, अमरावती. |
| २ | खाजगी इसम आरोपीचे नाव, पत्ता | १) श्री.मनिष नरेंद्रराव श्रीखंडे, वय २९ वर्षे, व्यवसाय — शासकिय कंत्राटदार, रा. घर नं. ५४ केदारेश्वर मंदीर रोड केदार चौक वरूड, जि. अमरावती<br>२) श्री.सुदेश भरत मेंघाणी, वय ३२ वर्षे, व्यवसाय — शासकिय कंत्राटदार, रा. यशवंत बाबा कॉलनी, अमरावती रोड वरूड |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | दि ०५/०३/२०२५ रोजी १७.२४ ते १७.३१ वा.दरम्यान |
| ४ | इतर लोकसेवकास लाच देवु केलेली रक्कम | २०,०००/—रुपये |
| ५ | इतर लोकसेवकास तडजोडीअंती लाच दिलेली रक्कम | २०,०००/— रुपये |
| ६ | घटनास्थळ | अरिहंतनगर परसोडी, ग्रामपंचायत हिंगणगाव ता. धामणगाव रेल्वे जि. अमरावती. |

**थोडक्यात हकिगत** :— यातील तक्रारदार पुरूष इतर लोकसेवक सरपंच यांनी दिनांक ०३/०३/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती येथे दिलेल्या खाजगी इसमा विरूध्द दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक ०५/०३/२०२५ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी इसम आरोपी नामे १) श्री.मनिष नरेंद्रराव श्रीखंडे, वय २९ वर्षे, व्यवसाय — शासकिय कंत्राटदार, रा. घर नं. ५४ केदारेश्वर मंदीर रोड केदार चौक वरूड, जि. अमरावती २)श्री.सुदेश भरत मेंघाणी, वय ३२ वर्षे, व्यवसाय — शासकिय कंत्राटदार, रा. यशवंत बाबा कॉलनी, अमरावती रोड वरूड यांना मौजे ग्रामपंचायत हिंगणगाव येथील रस्ता तयार करण्याचे काम त्यांना मिळाले असुन आरोपीत यांनी सदरचे काम १५ दिवसापुर्वी सुरू केले असुन रस्त्याचे काम शासनाच्या नियमाप्रमाणे न केल्याने सरपंच तक्रारदार यांनी बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिका—यांकडे तक्रारी केल्या. त्यामुळे तक्रारदार यांनी यातील आरोपीने निकृष्ट काम केल्यामुळे तक्रारी मागे घ्याव्या. आणि कामकाज पुर्ण झाल्यावर ग्रामपंचायत कडून देण्यात येणा—या प्रमाणपत्रामध्ये अडचण निर्माण करू नये याकरिता आरोपी क्रं. १ श्रीखंडे यांनी तक्रारदार सरपंच यांना लाच रक्कम म्हणुन २०,००० रू. आमिष देण्याचे मान्य करून २०,०००/— रू.लाच रक्कम दिली. व आरोपी क्रं. २. मेंघाणी यांनी लाच रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिले. .

आज दिनांक ०५/०३/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपीत नामे १) श्री.मनिष नरेंद्रराव श्रीखंडे, वय २९ वर्षे, २) श्री.सुदेश भरत मेंघाणी, वय ३२ वर्षे, यांनी पंचासमक्ष एकूण २०,०००/— रुपये तक्रारदार इतर लोकसेवक सरपंच यांना लाच रक्कम दिल्याने आरोपीत यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचेविरूध्द दत्तापुर पोलीस ठाणे, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.मंगेश मोहोड, पोलीस उपअधिक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पो.नि. संतोष तागड, तसेच पो.नि. केतन माजरे, पो.हवा. प्रमोद रायपुरे, पो हवा/ युवराज राठोड, पो हवा/राजेश मेटकर, पोलीस अंमलदार शैलेश कडु, पो अमलदार वैभव जायले, चालक पोउपनि/ सतिश किटुकले, चालक पोहवा गोवर्धन नाईक यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाचप्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क : ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.**
**ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,टोल फ्रि नंबर—१०६४**

संतोष तागड
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.